# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 9 JUNE 2012 Rs. 25

प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : सुनिता देशपांडे

जगभरातून हजारो लोकांनी ७ मे २०१२ या दिवशी प्रकाशाचे प्रवहन केल्यापासून प्रकाशाद्वारे क्रांती आता पुढच्या टप्प्यात पोहोचली आहे. आपण एवढ्यावरच थांबायला नको. आपल्याला दररोज प्रकाशाचे प्रवहन करायला हवे. जास्तीत जास्त लोकांनी ह्यात सहभाग घ्यायला हवा. क्रांतींची सुरवात होऊन अल्प काळातच त्या संपत नाहीत. ही क्रांतीतर नाहीच नाही. ही एक मूक क्रांती देखील आहे. पण मला माहीत आहे की, ही फार प्रभावी आहे.

आपण हे पण लक्षात ठेवायला हवे की, ही क्रांती सूक्ष्मपातळीवर घडवून आणण्यात येते आहे. संपूर्ण जगभर पसरलेले ऋषींचे नेटवर्क यावर कार्य करीत आहे. बाह्य अवकाशातील मास्टर्स त्यांच्या ऊर्जा आणि ज्ञानासह मदत करीत आहेत. स्वयंप्रेरणेने कार्य करणाऱ्या काही प्रकाश कार्यकर्त्यांच्या संपर्कात ते आहेत. अल्प काळातच या पृथ्वीवरील प्रत्येकाशी भौतिक पातळीवर किंवा सूक्ष्म पातळीवर संपर्क साधल्या जाईल आणि आपल्याला उच्च जीवनाकडे नेणाऱ्या, २०१२ साला अखेरीस मिळणाऱ्या संधींबद्दल सांगण्यात येईल.

२००८ साली सुरू झालेल्या प्रकाशाद्वारे क्रांतीचा प्रभाव मी बघतो आहे. लोकांमध्ये घडत असलेल्या जागृतींची दखल मी घेतो आहे. भ्रष्ट पद्धती आणि व्यवस्थांचा नकार, शांतीपूर्ण आणि न्याय्य जीवनाची आस मी लोकांमध्ये बघतो आहे. मी बदलांच्या लाटांना उफाळून येतांना आणि संपूर्ण जगात पसरतांना पाहतो आहे. मी बदलांच्या ऊर्जांच्या लाटा अनुभवतो आहे. त्यांना भौतिक पातळीवर पूर्णपणे प्रकट होण्यास कदाचित थोडा वेळ लागेल. पण हे बदल नक्कीच प्रकट होतील.

आपण स्थित्यंतराच्या एका खूपच खास टप्प्यातून जात आहोत. आपल्याला दोषपूर्ण आणि भ्रष्ट व्यवस्थांना सोसावे लागेल, एका उज्ज्वल भविष्याची आशा न सोडता आपल्या आजूबाजूला असलेल्या लोभ आणि हिंसाचारयुक्त जीवनातही आपले डोके भानावर ठेवून एका मूल्य व्यवस्थेची निवड करावी लागेल. हे दिवस खरंच फार आव्हानात्मक आहेत. आणखी जास्त प्रमाणात अनागोंदी आणि गोंधळ अपेक्षित आहे. या अवघड काळात आपला तोल न जाऊ देणे व आशा न सोडणे, हे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी आध्यात्मिक मार्गाशिवाय दुसरा मार्ग नाही. हा आध्यात्मिक मार्ग आहे : ध्यान करणे आणि ज्या आध्यात्मिक शक्तींचा पूर सध्या पृथ्वीवर येतो आहे, त्या शक्तींकडून मदत मिळवणे.

प्रकाशाकडून मदत मिळवणे हा सर्वात उत्तम पर्याय आहे. आता बऱ्याच जणांना कदाचित हे लक्षात येणार नाही. पण, अंततः, प्रत्येकजण प्रकाशाकडे वळेल. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)

**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) /
तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/–
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट
एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.




**७ मे, २०१२ – गुरुजी, प्रकाश प्रवाहकांच्या संमेलनात बोलताना**

## काही ठळक घडामोडी

- ७–५–२०१२ रोजी चौडय्या मेमोरियल हॉल, बंगलोर येथे झालेल्या लाइट चॅनल्स मीट मध्ये साधारण १००० लोकांनी भाग घेतला. हजारो लोकांनी आपापल्या ठिकाणांहून वेबकास्ट द्वारे भाग घेतला आणि जगाच्या सर्व भागांतून आणखी कित्येक लोकांनी त्यांच्या घरून प्रकाश प्रवाहित करून भाग घेतला.
- ह्या प्रसंगी गुरुजींच्या हस्ते "Experiences of Light Channels" हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. ह्या पुस्तकाची मोफत प्रत घेऊ इच्छिणाऱ्यांनी आम्हाला पत्राद्वारे किंवा ईमेल द्वारे लिहावे. हे पुस्तक आमच्या वेबसाईट वर मोफत डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे.
- गुरुजींनी सर्व लाइट चॅनलिंग स्वयंसेवकांना मेमेन्टो देऊन त्यांचा सन्मान केला.
- १७–५–२०१२ च्या मध्यरात्री तपोनगरातील रहिवाशांकडून, १९–५–२०१२ रोजी आनेकल येथे आणि २०–५–२०१२ रोजी तपोनगर येथे गुरुजींचा वाढदिवस साजरा करण्यात आला.
- २०–५–२०१२ रोजी तपोनगर येथे झालेल्या गुरुजींच्या वाढदिवस समारंभाच्या प्रसंगी चार पुस्तके प्रकाशित करण्यात आली – "Guruji Speaks (Vol-5)", "Quotes from the Rishis", "Master-Pupil Talks" ह्या पुस्तकाचा मराठी अनुवाद आणि "Channelled Knowledge from the Rishis (Vol-2)" ह्या पुस्तकाचा कन्नड भाषेतील अनुवाद.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०४ | सोमवार | पौर्णिमा<br>चंद्रग्रहण दुपारी २.१८ ते संध्याकाळी ६.४८ पर्यंत |
| १२ | मंगळवार | कृष्णाष्टमी |
| १७ | रविवार | शिवरात्री |
| १९ | मंगळवार | अमावास्या |
| २० | बुधवार | आषाढ मासारंभ |
| २७ | बुधवार | शुक्लाष्टमी |
| २९ | शुक्रवार | शुक्ल दशमी |

## तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी –व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत
–विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

सोमवार ४ जून –चंद्रग्रहणानिमित्त विशेष ध्यान, दुपारी २.१८ ते संध्याकाळी ६.४८ पर्यंत

**गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, ९–६–२०१२ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.**

गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष ग्रुपच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

## लाईट चॅनल्स मीट – ७ मे २०१२

जयंत देशपांडे, अनुवाद : वैशाली जोशी

२००८ साली गुरुजींनी आपली ओळख प्रकाश प्रवहनाशी करून दिली आणि तेव्हापासून आपण सर्व ध्यानसाधक प्रकाशाचे प्रवहन करीत आहोत. त्यानंतर २००९ मध्ये शाळेतील मुलांना त्याची ओळख करून देण्यात आली. तेव्हापासून २० लाखांपेक्षा आधिक मुलांनी प्रकाशाचे प्रवहन केले आहे. गुरुजी फार पूर्वीपासून २०१२ सालातील घटनांच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल आणि चैतन्याच्या महान क्रांतीबद्दल त्यांच्या वर्गांतून सांगत आले आहेत. ह्या सर्व ज्ञानाचे आणि जाणिवेचे संपूर्ण जगभर प्रसारण व्हायला हवे. आणि ७ मे चा कार्यक्रम ह्या दिशेने प्रयत्नांसाठी आणि ह्या महान आणि शेवटच्या प्रकाशाद्वारे क्रांतीला पसरवण्यासाठी एक चांगली सुरुवात होती.

ह्या कार्यक्रमाची तयारी खूप अगोदर पासून म्हणजे फेब्रुवारीमध्येच सुरू झाली. स्वयंसेवकांनी गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली भौतिक पातळीवर काम केले आणि गुरुजी सूक्ष्म स्तरावर, अनेक महान गुरूंना ह्या कार्यक्रमाला उपस्थित राहून आशीर्वाद देण्यासाठी आमंत्रित करण्याच्या महत्त्वाच्या कार्यात व्यस्त होते. सखोल नियोजनाच्या टप्प्यानंतर अचूक कार्यान्वयनाच्या टप्प्यास सुरुवात झाली. स्वयंसेवकांच्या प्रेम, निष्ठा आणि मेहनतीमुळे आणि ऋषींच्या कृपेने हा कार्यक्रम खूप यशस्वी झाला. कार्यान्वयनाच्या दरम्यान प्रकाशाच्या मदतीचा प्रत्यय पदोपदी आला.

चौडय्या मेमोरियल हॉलमध्ये जवळजवळ एक हजार लोक जमले होते. सूक्ष्म स्तरावर, शंबलातील महान गुरू आणि इतर अनेक महान गुरू उपस्थित होते. हजारो लोक हा कार्यक्रम इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारणाद्वारे पहात असताना गुरुजींनी ऋषींचा संदेश खूप स्पष्टपणे, साधेपणाने आणि विनम्रपणे लोकांपर्यंत पोहोचवला. संध्याकाळी ७.४५ वाजता जेव्हा प्रकाश प्रवहनास सुरुवात झाली तेव्हा संपूर्ण हॉलमध्ये दैवी शांतता पसरली. त्यावेळी, बुद्ध पौर्णिमेला खाली आणलेली एक महान ऊर्जा संपूर्ण जगात प्रवाहित केली गेली. हजारो लोकांनी जगातील वेगवेगळ्या जागांतून त्याच वेळी प्रकाश प्रवाहित करून ह्यात भाग घेतला. १५ मिनिटे प्रवहन केल्यानंतर गुरुजींनी लाइट चॅनल्सचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांना लाईट चॅनल्सचे मेमेन्टो भेट देऊन सन्मानित केले. त्यांच्यातील अनेक जण कृतज्ञतेच्या भावनेने भारावून गेले आणि अनेक स्वयंसेवक म्हणाले की, हा त्यांच्यासाठी आयुष्य सार्थक करणारा क्षण होता.

ह्या कार्यक्रमामुळे लोकांना आशेचा प्रकाश मिळाला आणि ऋषींकडून एका गौरवशाली भवितव्याचे आणि फार दूर नसलेल्या नवीन युगाचे आश्वासन मिळाले. ■

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

एप्रिलचा महिना गुढी पाडव्याच्या नवीन ऊर्जा आणि अक्षय्य तृतीयेच्या विशेष ऊर्जा घेऊन आला. गुड फ्रायडेच्या दिवशी विशेष ध्यान करण्यात आले.

काही रहिवासी स्वयंसेवक ज्या उत्कटतेने मे २०१२ च्या प्रकाश प्रवहन कार्यक्रमासाठी काम करीत होते त्याची बरोबरी उन्हाळ्याचे वाढते तापमान करू शकले नाही. नियमित बैठकी, नियोजन, क्रमयोजन इत्यादी संपूर्ण महिनाभर चालू होते. सगळी कामे जोरात सुरू होती आणि ह्या सगळ्याच्या मध्यात तपोनगरचा आत्मा – आपले गुरुजी – एकांतात बसून नवीन ऊर्जांसह आणि सूक्ष्म पातळीवरील योजनांवर कार्य करीत होते ज्यांच्याबद्दल कदाचित आपल्याला कधीच कळणार नाही. आकाशगंगेच्या शांत आणि शक्तीशाली केंद्राप्रमाणे ते कार्यक्रमाच्या वेगवेगळ्या अंगांचे पर्यवेक्षण आणि मार्गदर्शन करीत होते. तपोनगरसारख्या लहान आणि साध्या जागी महान प्रकाश गुरुंच्या विशाल आणि क्लिष्ट योजना कार्यान्वियत होतात.

गुरुजी त्यांच्या कार्यात व्यस्त असून सुद्धा वेळ काढून रहिवाशांच्या मासिक बैठकीस आले आणि त्यांनी आम्हाला एक महत्त्वपूर्ण धडा शिकवला. संपूर्ण तपोनगर हे एका मोठ्या खडकावर बसलेले असून जमिनीखालचे पाणी उपसून वापरण्याचे बहुतेक प्रयत्न असफल झाले आहेत, तरीही उन्हाळ्याची असह्य उष्णता आणि परिणामस्वरूप असलेल्या पाण्याच्या टंचाईची तपोनगरवासियांना उणीव भासत नाही. गावातील टँकरने जेमतेम रोजच्या गरजा भागतील एवढेच पाणी पुरवले जाते – जास्त नाही की कमी नाही. गुरुजी म्हणतात की ही परमेश्वराची कृपा आहे. आमच्यासाठी मात्र ही केवळ गुरुजींचीच कृपा आहे. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.
२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.
३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.
४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.
५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.
६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.
७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०१-०४-२०१२

साधना ही जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. ही एक अशी प्रक्रिया आहे जिथे आपण परमेश्वराशी संबंध प्रस्थापित करतो. सर्वांचा मूलस्रोत आणि सर्व सृष्टीच्या पाठीशी असणारी दिव्य प्रज्ञा जो स्वतः आहे अशा परमेश्वराशी आपण नाते जोडतो. आपण इथे का आहोत, आपल्याला समस्या का आहेत, ह्या आणि तत्सम अनेक गोष्टी प्रत्यक्ष अनुभवाने आपल्या लक्षात येतात.

आध्यात्मिकतेची सुरवात आयुष्यातल्या छोट्या छोट्या बाबींपासून होते. आयुष्यातला प्रत्येक लहानसहान तपशील माणसाने तत्परतेने, व्यवस्थितपणे हाताळला पाहिजे. तुमचा प्रत्येक पैलू तुम्हाला आध्यात्मिक बनवत असतो. आध्यात्मिक प्रगल्भता तुमच्या वागण्यातून दिसली पाहिजे. केवळ तुमच्या गुरुंशी बोलताना नव्हे तर कोणाशीही बोलताना तुम्ही कोणत्या सुरात बोलता हेही महत्त्वाचे आहे.

तुम्ही माझा विचार करता त्यावेळी तुम्ही माझ्याशी व माझ्या ऊर्जांशी सुद्धा मनाने जोडले जाता. तुमच्या भावनेच्या तीव्रतेनुसार ऊर्जा प्रतिसाद देतात. मला पाहण्याची तुम्हाला इच्छा असल्यास एखादे वेळी तुम्हाला तसे दृश्य दिसू शकते. तुम्हाला माझ्याशी बोलायचे असल्यास कदाचित ह्या ऊर्जा तुमच्याशी बोलतात. अशा रीतीने संभाषण होऊ शकते. असे कोणाबरोबरही होऊ शकते. परंतु, तुम्ही थोडे सावध असायला हवे कारण, एखादे दुष्ट व्यक्तित्व माझे रूप घेऊ शकते. तुम्ही मला विचारून खात्री करू शकता.

आपली संपूर्ण शरीर-व्यवस्था - मन, बुद्धी व शरीर हे आपले मित्र आहेत. तुम्हाला प्रकाश पाहायचा असेल तर तुमचे मन तुम्हाला प्रकाश दाखवते. त्यामुळे तुम्ही सावध राहायला हवे. मनाच्या क्लृप्त्यांना बळी पडू नका. मन तुम्हाला खूष करू पाहाते. ते करताना अतिरेक करते. त्यामुळे मन दाखवते त्यावर संपूर्णपणे विसंबून राहू नका.

प्रकाश प्रवहन करणे पुरेसे नाही. प्रकाश प्रवहन करणाऱ्यांनी प्रकाश काय आहे, त्याचे कार्य कसे चालते ते नीट समजून घेतले पाहिजे. त्यांनी प्रथम स्वतःचे आयुष्य अत्यंत सुयोग्य रीतीने जगले पाहिजे. लोक तुमच्याकडे अपेक्षेने पाहतील. तुम्ही तुमच्या कोणत्याही कर्तव्याकडे वा जबाबदारीकडे कधीही दुर्लक्ष करू नका.

मी १९७७ सालापासून बघतो आहे की जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा लोक अध्यात्म विकू पाहातात. अध्यात्माचा बाजार झालेला पाहून मला वाईट वाटते.

एका माणसाने पुस्तकातून एक तंत्र उचलले आणि ध्यानाला सुरुवात केली. एकदा अचानक त्याला त्याच्या मस्तकात आगीच्या ज्वाळा तडतडतात तसे आवाज ऐकू येऊ लागले. त्याला संपूर्ण शरीरात उष्णता जाणवली. मी त्याला ध्यान थांबविण्यास सांगितले. त्याला जाणवलेली विकृती त्या विशिष्ट साधनेमुळे निर्माण झाली होती. ज्यांनी पूर्वायुष्यांमध्ये चुकीची साधना केली ते आजसुद्धा त्याचे दुष्परिणाम भोगत आहेत. त्यामुळे अशा तऱ्हेचे उद्योग करण्याचे साहस करू नका.

०८-०४-२०१२

वैयक्तिक मार्गदर्शन उच्च पातळीवरील साधनेसाठी दिले जाते. तुमच्यामध्ये जर नकारात्मकता असतील तर याचा अर्थ अजून तुमची त्यासाठी तयारी झालेली नाही असा होतो. तुम्ही धीराने वाट पाहिली पाहिजे. प्रथम छान ध्यान करा. प्रकाशाचा अनुभव घ्या. सर्व शंबला तत्त्वे आचरणात आणा. परिपूर्ण ज्ञान मिळवा. त्यानंतरच तुम्ही उच्च स्तरावरील साधनेसाठी मार्गदर्शन मिळविण्यास योग्य बनाल.

आध्यात्मिक प्रगती बरोबर तुमची प्रत्येक क्षेत्रात प्रगती होईल. तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उजळून निघेल. तुमच्या तोंडून उच्चारला जाणारा प्रत्येक शब्द प्रेमाने ओथंबून बाहेर पडेल. आध्यात्मिक साधना ध्यानापासून नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक तपशीलापासून सुरू होते.

ओरिएंटेशन वर्गात अनुभवास आलेल्या फोटॉन बेल्टच्या ऊर्जांमुळे काही लोकांना तात्पुरते माफक आजारपण आले. ह्या ऊर्जांना नकारात्मकतेचा पुसटसा अवशेषही चालत नाही. त्यामुळे त्यांनी तो निपटून काढण्याचा प्रयत्न केला. कदाचित त्या लोकांनी आत्म्याच्या स्तरावरून प्रकाशाची निवड केली नसावी. ह्या सर्व ऊर्जा आपल्याजवळ केवळ आपल्याला मदत करण्यासाठी येतात. त्यांचा आपल्याला कोणत्याही प्रकारे त्रास देण्याचा हेतु नसतो.

ओरिएंटेशनच्या सत्राने लोकांमध्ये पुष्कळ बदल देखील घडवून आणले. एका स्त्रीला चालता चालता विचार विरहित अवस्थेचा, एक प्रकारच्या शून्यतेचा अनुभव आला. तिचे शरीर कामात व्यस्त असताना सुद्धा तिची जाणीव शरीर, मन व बुद्धी लांघून उच्च स्तरांवर जाऊ शकत होती. ही परमानंदाच्या अनुभवाची अवस्था आहे. असा एक अनुभव आपले जीवन बदलून टाकण्यासाठी पुरेसा असतो.

अतिदक्षता विभागात असलेली एक तरुण मुलगी तिचे वडील तिला भेटायला आल्यावर खूप आनंदित झाली. ते खूपच हसरे व ऊर्जांनी ओतप्रोत भरल्यासारखे दिसत होते. तिच्यासोबत काही काळ व्यतीत करून ते परत गेले आणि तिच्या आईला घेऊन आले. तेव्हा तिच्या लक्षात आले की ते तिला भेटायला त्यावेळी प्रथमच येत होते. तिचा समज आहे की तिच्या वडिलांचे रूप घेऊन तिला आधी भेटून गेलेली व्यक्ती मी होतो. तो मीच होतो ! असे अप्रतिम अनुभव फार जणांना येत नाहीत.

एक स्त्री द्विधा मनस्थितीमध्ये होती. तिने विचारले, ''लबाडी करणाऱ्या माणसाशी आपण कसे वागावे?'' मी तिला दोन नियम पाळण्यास सांगितले. पहिला नियम, 'त्या माणसाचा तिरस्कार करू नकोस, त्याच्याकडे प्रेम पाठव.' दुसरा नियम असा की त्याला तुझा फायदा घेऊ देऊ नकोस.

काही लोक विचारतात, ''आपण आताच प्रकाशाबद्दल का बोलतो आहोत?'' कारण, कलियुगातील मागच्या ५००० वर्षात प्रकाशाला संधी नव्हती. तेव्हा संधी अंधाराकडे होती. आता आपण प्रकाशयुगात प्रवेश करतो आहोत. साहजिकच आपण प्रकाशाला जाणले पाहिजे, प्रकाशाचा अनुभव घेतला पाहिजे आणि प्रकाश पसरवला पाहिजे. नूतन ऊर्जांच्या कृपेमुळे लोक जागे होत आहेत. ते प्रकाशाला सहज समजून घेतात व प्रकाश प्रवहन करतात. आधीच्या काळात हे शक्य झाले नसते.

१५-०४-२०१२

कित्येकदा, प्रश्न आणि त्यांची उत्तरे सुद्धा परिचयाची वाटू शकतात. परंतु, कृपया लक्षात घ्या की उत्तरामध्ये दरवेळी एक नवा पैलू जोडला जातो. हा मार्ग समजून घेण्यासाठी, आध्यात्मिक साधना, ध्यान आणि जीवनाबद्दल समजून घेण्यासाठी तुम्ही आमची पुस्तके वाचायला हवी.

अनौपचारिक बैठक हे भेटण्याचे एक फार विशेष निमित्त असते. ती एक दुर्मिळ संधी असते जिथे तुम्ही नवीन प्रश्न विचारू शकता आणि मी सुद्धा नवीन ज्ञान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू शकतो. दैनंदिन जीवन जगण्यासाठी लागणारे ज्ञान सर्वात महत्त्वाचे आहे. त्याविषयी आम्हाला ऋषींकडून स्पष्ट मार्गदर्शन मिळालेले आहे. ज्यांना अनौपचारिक बैठकीस हजर राहायचे असेल त्यांनी कृपया चांगली तयारी करावी. कारण, बैठकीची गुणवत्ता नेहमी मला विचारल्या

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

जाणाऱ्या प्रश्नांवर अवलंबून असते.

जेव्हा जेव्हा आपण भूकंप, ज्वालामूखीचा उद्रेक, चक्रीवादळ, सौर आगी इ. विषयी ऐकतो तेव्हा आपण त्यांच्या विनाशकारी बाजूचाच विचार करतो. अशा सर्व घटनांमध्ये आध्यात्मिक ऊर्जा प्रसृत केल्या जात असतात. अलीकडचा भूकंप हे सर्वात चांगले उदाहरण आहे. एवढा मोठा भूकंप असून सुद्धा एकही मनुष्य दगावला नाही. ऋषींना नवीन, सामर्थ्यशाली ऊर्जा प्रसूत करायच्या होत्या. म्हणून त्यांनी हा भूकंप होऊ दिला.

केव्हा केव्हा लोक विचारतात, ''विनाश होण्याची मुळात गरज काय?'' आपल्या भोवतालचे जीवन, ह्या ग्रहावरील जीवन, सृष्टीच्या निर्मितीची प्रक्रिया हे सर्व समजणे अवघड आहे, पण अशक्य नाही. आमच्या पुस्तकातील ज्ञान जर तुम्ही संपूर्णतया समजून घेतले तर तुम्हाला कळेल की विनाश सुद्धा एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. तसेच वेदना आणि दुःखही नैसर्गिक आहे. सृष्टीच्या खेळाचा तो भाग आहे. जे जे निर्माण होते ते नष्ट होणारच हा नियम आहे. त्यामुळे, परमेश्वर, जो निर्माण करतो व विनाशही करतो, त्याच्यावर या गोष्टींचा परिणाम होत नाही. तुम्हाला सुद्धा त्या पदाला पोचायचे आहे. त्यासाठी साधना तुम्हाला मदत करते. प्रकाश मदत करतो. मी नेहमीच आग्रहाने सांगतो की प्रकाशाचा जास्त अनुभव घ्या.

वस्तू वाटून घेणे, विशेषतः मौल्यवान वस्तू वाटून गेणे हा मनुष्यस्वभाव आहे. प्रकाशाचा सर्वात अधिक फायदा सर्वप्रथम तुम्हाला होतो कारण, तुमच्या मधून प्रवाहित होत असताना प्रकाश तुमची संपूर्ण शरीर व्यवस्था स्वच्छ करतो. तुमची तयारी असेल तर तो तुमच्यात परिवर्तन घडवतो. प्रकाश प्रवहन ही उत्तम साधना आहे. तुम्ही याबद्दल इतरांना सांगितले पाहिजे आणि त्यांना प्रगत होण्यास मदत केली पाहिजे, परंतु, इतर लोक अद्याप त्यासाठी तयार नसतील तर तुम्ही त्या बाबतीत काहीही करू शकत नाही. तुम्ही फक्त त्यांच्यासाठी वाईट वाटून घेऊ शकता.

प्रकाश आपल्या सर्व अडचणींचे निवारण करतो. जेव्हा जेव्हा अडचण त्वरित दूर होत नाही तेव्हा प्रकाश आपल्याला त्या समस्येला झेलण्यासाठी धीर व विवेक देतो आणि अडचण हळूहळू दूर होते. जर तुम्ही आत्म्याच्या स्तरावरून प्रकाशाला निवडले असेल तर प्रकाश तुमच्या सर्व समस्या सोडवतो. तुमची निवड मनापासून असेल तर प्रकाश सर्व सूत्रे स्वतःकडे घेतो.

साधक नसलेल्या, आपल्याला पूर्णपणे अपरिचित अशा एका माणसाने 'शंबला तत्त्वांचा अभ्यास' हे पुस्तक वाचले. तो म्हणतो की त्याने सूक्ष्म देहाने शंबला नगरीत जाण्याचे तंत्र वापरले कारण त्याला भगवान कल्कींना भेटायचे होते. परंतु त्या दिवसापासून त्याला स्वतः भोवती एका आत्म्याचा वावर जाणवतो आहे. त्याने मला लिहिले, 'कृपा करून मला मदत करा.' मी त्याला विचारले. 'तुम्ही सूक्ष्म देहाने प्रवासाचा प्रयास का केला?' तो म्हणाला की त्या पुस्तकात सूक्ष्म देहाने प्रवास न करण्या विषयी काहीच सूचना दिलेली नाही. मी त्याला सांगितले की त्या पुस्तकात सूक्ष्म देहाने प्रवास करावा असेही सूचित केलेले नाही. मी कधीही कुठेही म्हटलेले नाही की तुम्ही शंबला नगरीला सूक्ष्म देहाने जावे.

२२-०४-२०१२

तपोनगरला हल्लीच भेट दिलेली एक स्त्री म्हणाली, 'इथे मला भरपूर ऊर्जा मिळाल्या.' ती म्हणाली की तिने या ऊर्जा ग्रहण केल्या. ती पुढे म्हणाली, 'मला आणखी कसलीच गरज नाही. मला सर्व काही मिळाले आहे. इथून पुढे मी केवळ प्रेम व प्रकाशावर जगणार आहे.' हीलिंग करताना तिने संजीवक ऊर्जांबरोबर प्रकाशही पाठवला आणि परिणाम दसपट वेगाने झाला. अशा रीतीने ज्यांना प्रकाश मिळतो त्या लोकांना शांती अनुभवास येते. तसेच, एका खोल स्तरावर त्यांना थोडेफार ज्ञानही मिळते. प्रकाश त्यांच्या परिवर्तनाला सुद्धा मदत करतो.

२०१२ सालाच्या शेवटी पोहोचेपर्यंत आपल्याला सामान्य मनुष्यांप्रमाणेच जगावे लागेल. आहे त्यात कोणतेही बदल करू नका. ध्यान करा व सकारात्मक व्हा. एवढी तयारी पुरेशी आहे. केवळ चांगले, प्रामाणिक व शांतीपूर्ण असणे हाच आध्यात्मिक साधनेचा अर्थ आहे हे लक्षात घ्या. जर अशा रीतीने तुम्ही तयारी केली नाही व सर्वसामान्य जीवन जगत राहिलात तर कदाचित तुम्हाला संकटांना तोंड द्यावे लागेल. आपल्यातील प्रत्येकाजवळ २०१२ च्या घटनांतून सुखरूप पार पडण्याची क्षमता आहे व आपल्याला ते जमलेच पाहिजे कारण, त्यापुढचे युग अतिशय अप्रतिम असणार आहे.

लोकांना संसारापासून पळून जाण्यास, हिमालयात जाण्यास आम्ही कधीही प्रोत्साहन देत नाही. तुम्ही जिथे असाल तिथे राहा. आर्थिक स्थिती कशीही असो, तुम्ही हे जीवन योग्य रीतीने, शहाणपणाने जगा. असे आपण केले नाही तर माझ्या मते ऋषींच्या आपल्यावरील विश्वासाला तडा जाईल. जीवन साधे, सरळ व शांतीपूर्ण असू शकते पण आपण कारण नसताना त्याचा विचका करतो.

आपल्यातील हे मनुष्यत्व फार मौल्यवान आहे. दुसऱ्या माणसाशी आपल्या अंतःकरणापासून नाते जोडणे किती सुंदर असते. आपल्या मनात केवळ स्वतःबद्दल व स्वतःच्या कुटुंबाबद्दलच नव्हे तर आपल्या राष्ट्राबद्दल व संपूर्ण जगाबद्दल आस्था असायला हवी. म्हणून प्रकाश प्रवहन करा. आपण आपल्यातील या मानवी भागाला आपल्या ध्यानाच्या, इतरांशी नाते जोडण्याच्या व आपल्या वैश्विक बनण्याच्या मार्गात आडवे येऊ देऊ नये. आपण आपल्यातील मानवी भागाचा आनंद घेऊ, त्याला नेहमी जिवंत ठेवू आणि 'त्याला आपल्या वैश्विक बनण्याच्या वाटेवरचा अडथळा नव्हे तर प्रवेशद्वार बनवू.'

शांत होणे, स्तब्धतेच्या महासागरापर्यंत पोहोचणे आणि जाणिवेचा परिघ विस्तारणे हा ध्यानामागचा हेतु आहे. परंतु, तुम्ही जेव्हा एखादी कॅसेट ऐकून त्यातील सूचनांनुसार ध्यान करता व साधना करता तेव्हा तुम्ही त्याच पायरीवर राहता. तुम्ही त्या मंत्रापलीकडे, तुमच्या मनापलीकडे जाऊ शकत नाही. हे स्पष्टपणे ध्यानात घ्या.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी आपण आपल्या जीवनाच्या पारमार्थिक व भौतिक अंगांविषयी निश्चय करून ते देवासमोर ठेवायचे असतात. या दिवशी उपलब्ध असणाऱ्या ऊर्जा आपली भौतिक व पारमार्थिक उद्दिष्टे सहजपणे पूर्ण करण्यास आपल्याला मदत करतात.

ऋषी आपल्या ध्यानावर आणि आपल्या सर्व उपक्रमांवर लक्ष ठेवतात. बहुतेक वेळा ते उच्च लोकांतून आपल्यावर लक्ष ठेवतात.

ओरिएंटेशन वर्गाचे वेबवरून प्रसारण करण्यात आले. ओरिएंटेशन वर्गासाठी ज्यांनी त्यांचे नाव नोंदवले होते, केवळ त्यांच्यासाठीच प्रसारण करण्यात आले होते. परंतु, ओरिएंटेशन वर्गात देण्यात आलेली तंत्रे काही साधकांनी इतरांनाही दिली. हे योग्य नव्हते. ज्या लोकांनी ही तंत्रे इतरांना वाटली त्यांना त्या दिवशी त्या तंत्रांच्या अभ्यासामुळे मिळालेले फायदे नष्ट झाले आहेत. ज्या इतरांनी त्या तंत्रांचा वापर केला त्यांना त्याचे फायदे मिळणार नाहीत. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- ★ मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट “Manasa Light Age Foundation Bangalore” च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

शोभा राव, अनुवाद : प्रेरणा काळे

पूर्णपणे नसली तरी एक प्रकारची अलिप्तता माझ्यात नक्कीच आली आहे. जीवन हे अस्थायी आहे, हे मला आता चांगले समजले आहे. खूप वेळा मला खरंच असं वाटतं की, मी इथे फक्त एक पाहुणी मात्र आहे. त्यामुळे मी सगळंकाही, सर्व घडामोडी एका अंतरावरून पाहू शकते.

– शांता कुमारी एच. एस्.

माझ्या गरोदरपणात सात महिने मी प्रकाश प्रवहनाच्या कार्यात व्यस्त होते. माझ्या बाळाला सुद्धा मी नियमितपणे प्रकाश पाठवत होते. माझ्या बाळाशी मी नेहमी तुमच्याबद्दल आणि तपोनगराविषयी बोलत असे. आता तिच्या जन्मानंतर मी जेव्हा जेव्हा ‘गुरुजी’ असे म्हणते तेव्हा ती प्रतिसाद देते आणि तिच्या चेहेऱ्यावर हसू येतं. मी जेव्हा प्रकाश प्रवहनाच्या तंत्राविषयी बोलते तेव्हाही ती प्रतिसाद देते. जणू काही ती सांगत असते की तिला हे सर्व माहीत आहे !

– करुणा मुरारी

या सुंदर बेबकास्टबद्दल मी अत्यंत आभारी आहे. प्रत्येक आठवड्यात तुम्हाला ऐकून मला बेसिक्स, महत्त्वाच्या शिकवणी आणि संदेश समजण्यात मदत होते. ‘अग्रक्रम ठरवा’ अशासारखे अगदी साधे संदेश सुद्धा त्यांचं महत्त्व कळण्यासाठी आणि त्यांना जीवनात प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी बरेच कठीण आहेत.

– लिन् करातनी

मागील काही महिन्यांपासून मी माझ्या कुटुंबाच्या काही जाबाबदाऱ्या, त्यांना न पार पाडण्याच्या वेगवेगळ्या सबबी आठवून, टाळण्याचा प्रयत्न करत होतो. मला लक्षात आले की, परिस्थितींना दोष न देता कामं करून टाकणं जास्त सोपं आहे. अचानक सर्व गोष्टी सोप्या झाल्या, संघर्ष नाहीसा झाला. कुठल्याही अपेक्षा न ठेवता परमेश्वराला शरण जाणे म्हणजे नक्की काय तेही मला समजले. परत एकदा मला माझ्या तनामनात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह जाणवू लागला आहे.

– कविता मंजुनाथ

मी खूप शांत झालो आहे. मी सगळ्यांशी प्रेमाने वागू लागलो आहे. सर्वांना प्रकाश आणि प्रेम पाठवू लागलो आहे, अगदी अशा लोकांना सुद्धा ज्यांना मी आवडत नाही ! मला समजू लागले आहे की हा सर्व देवाचा खेळ आहे आणि त्याला शरण जाणे आता मला सोपे वाटते आहे. मी सर्व गोष्टीत देवाला पाहू लागलो आहे, अनुभवू लागलो आहे. गेले काही आठवडे माझ्या आयुष्यातले अद्भुत दिवस होते.

– जगदीश हिरेमठ

एका पातळीवर मला माहीत आहे की मी एक आत्मा आहे आणि आणखी एका पातळीवर ही जाणीव आहे की, अजून खूप काही जाणायचं आहे, अनुभवायचं आहे. लाइट एज मास्टर्स ह्यांनी मला माझ्या अंतरंगातील एका अतिप्राचीन अस्तित्वाशी जोडून दिले आहे. अफर्मेशन्स माझे अंतरंग विस्तारतात आणि खूप आनंद मिळवून देतात. मला अजून पर्यंत कधीही हा हिरवा प्रकाश जाणवला नव्हता. आता मला लाइट मास्टर्स बरोबर राहायचं आहे आणि त्यांच्यापासून कधीच दूर जायचं नाही. इतकी पूर्णता मला कधीच जाणवली नव्हती. यापूर्वीचे सर्वकाही लाइट मास्टर्सकडे येण्याची तयारीच होती.

– मार्शिया स्टो

प्रकाश प्रवहनानंतर एका छोट्या मुलीने डोळे उघडले आणि तिच्या चेहेऱ्यावर सुंदर हसू फुलले. जेव्हा ती चालत माझ्याजवळ आली आणि मला एक चॉकलेट दिलं, तेव्हा मी भारावून गेले. तो काही तिचा वाढदिवस नव्हता. तिने नक्कीच ते चॉकलेट तिच्यासाठी जपून ठेवलं होतं पण मोठ्या मनाने तिने ते मला दिलं. तिची ही आभार मानण्याची छोटीशी कृती मनाला स्पर्श करणारी होती. अशा तेजस्वी आत्म्यांकडून भेटवस्तू मिळण्याचा अनुभव केवळ प्रकाश प्रवहनामुळेच शक्य आहे.

– पद्मजा बालाजी

ओरिएंटेशन क्लासला आल्यापासून मला माझ्यात खूपच सकारात्मक बदल जाणवत आहेत. आता मला ध्यान करायला आवडू लागलं आहे. जेव्हा मी डोळे बंद करते, तेव्हा मला वाटतं की, मी फक्त एक छोटासा बिंदू आहे आणि माझे शरीर खूप हलके झाल्यासारखे वाटते. खाण्याची आस आता कमी झाली आहे. मनातली खळबळ संपली आहे. माझे मनही अतिशय हलके झाले आहे. खूप खूप धन्यवाद.

– चेला सुभद्रा

माझ्या आयुष्यात सर्वात चांगली गोष्ट कुठली घडली असेल तर ती म्हणजे हा ध्यानाचा कोर्स करणे. ह्याच्यामुळे माझ्या क्षमतेच्याही पलीकडे माझी प्रगती होते आहे, माझी समज वाढली आहे. मी तुमची अत्यंत आभारी आहे.

– नंदिता पटेल

# प्रकाशाद्वारे क्रांतीच्या कार्यक्रमाबद्दल लोकांचे अभिप्राय

संकलन : जयंत देशपांडे, अनुवाद : सुनिता देशपांडे

या कार्यक्रमाची आठवण ठेवण्यासाठी मी स्वतः कुठल्याही प्रकारे प्रयत्न केले नाहीत पण कार्यक्रमाला सुरवात होत असताना अगदी त्याचवेळी मला दैवी मार्गदर्शन मिळाले आणि आठवण झाली. तो एक अद्भुत अनुभव होता ! माझ्याकडून मी दररोज मानवतेच्या कल्याणासाठी प्रकाशाचे प्रसारण करणे सुरू ठेवेन.

– पॅट्रिशिया चाइडेझ

मी हा कार्यक्रम वेबकास्टवर प्रत्यक्ष पाहू शकल्याने खूप आनंदी आहे आणि स्वतःला खूप भाग्यशाली समजते. किती दयार्द्र, सभ्य आणि शांतीपूर्ण व्यक्ती आहेत गुरुजी कृष्णानंद ! त्यांचा संदेश या युद्धाच्या काळात, देशदेशांतील वैमनस्याच्या, धर्मधर्मांमधील द्वेषभावाच्या आणि आपल्याला माहीत असल्याप्रमाणे जीवनातील अशांतता आणि अनिश्चिततेच्या काळात खूपच महत्त्वपूर्ण आहे.

माझी रोमन कॅथलिक पार्श्वभूमी असूनसुद्धा, मला एकदा पण असे वाटले नाही की, या शक्तीशाली जगतव्यापी प्रकाशाद्वारे क्रांतीचा हिस्सा होण्यासाठी, ज्या धार्मिक गोष्टींवर माझा विश्वास आहे, त्या सोडाव्याच लागतील. आणि माझा असा ठाम विश्वास आहे की, वेगवेगळ्या धर्मांचे आणखी इतर अनेक लोक हा वेबकास्ट पाहत आणि ऐकत होते. गुरुजी कृष्णानंदांनी कोणत्याही वेळी त्यांच्या बोलण्यात धार्मिक तत्त्वप्रणालीला आणले नाही. आपण आपआपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे जीवन जगूनही, संपूर्ण विश्वात ही सकारात्मक प्रकाश ऊर्जा (परमेश्वर) पाठवण्याच्या साध्या ध्यानाच्या तंत्राचा अभ्यास करू शकतो.

– लुआन डेलुका

तो खरच एक सुंदर कार्यक्रम होता ! मी खूपच भाग्यशाली आहे की, मी अमेरिकेतून ह्या कार्यक्रमात सहभागी होऊ शकले. जगाच्या पाठीवर कुठेही असले तरी या कार्यक्रमात प्रत्येकाला सहभागी होणे शक्य केल्यामुळे मी आपली फार आभारी आहे !

– लिन्डा डिर्क्स सॉयर

जागतिक आध्यात्मिक बदलाच्या या काळादरम्यान मी तुम्हा सर्वांसोबत गुरुजींचा संदेश ऐकू शकलो ह्याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो. त्यांचा संदेश खूपच महत्त्वाचा आणि प्रेरणादायी होता. गरज पडली तर मी ऋषींना मदतीसाठी नक्कीच आवाहन करेन.

– ग्विआन जेकब

आतापर्यंत या गटाबद्दल मला माहीत नव्हते. मला हे माहीत होते की प्रकाश कार्यकर्ते आहेत आणि ते सर्व जगभर पसरलेले आहेत. तुमच्याशी मी अगदी मनापासून जोडला गेलो ह्याचा मला आनंद आहे.

– मोलनार

प्रकाशाद्वारे क्रांतीचा कार्यक्रम म्हणजे माझ्या जीवनातील एक सर्वात महान घटना होती. तुमचे भाषण हे खूप उत्साहवर्धक आणि परिपूर्ण असे होते. माझे काही सहकारी आणि मित्र जे कार्यक्रमाला उपस्थित होते आणि ज्यांनी वेबकास्ट पाहिला ते म्हणाले की, कार्यक्रम फारच छान आणि प्रेरणादायी होता.

– प्रवीण पी. बी.

प्रकाशाद्वारे क्रांतीच्या कार्यक्रमात आम्हाला सहभागी होण्यासाठी इतकी छान संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. कार्यक्रम अतिशय सफल झाला. माझ्या परिवारातील सर्व लोकांनी, माझ्या बऱ्याच मित्रांनी आणि परिचित लोकांनी प्रकाशाचे पवहन केले.

वेबकास्ट संघाचे सुद्धा आभार. मला असे वाटले की जणू काही मी तेथेच उपस्थित होतो. अश्रुपूर्ण डोळ्यांनी मी फक्त एवढेच म्हणू शकतो, "धन्यवाद गुरुजी आणि ऋषी. आता माझे जीवन पूर्ण झाले !"

– विश्वास दीक्षित

मेलबर्न, ऑस्ट्रेलिया येथे बरोबर सायंकाळी ७.४५ वाजता १५ मिनिटांसाठी प्रकाशाचे प्रवहन करून या चळवळीत आम्ही सहभागी झालो. यापूर्वी आमच्या जीवनात १५ मिनिटे इतक्या लवकर कधीच सरली नव्हती !

– मकरंद

प्रकाशाच्या प्रेमाला व्यक्त करण्यास आणि आचरणात आणण्याबद्दल कृतज्ञता कशी व्यक्त करावी? प्रकाशाचा मी कदाचित एक भाग असेन या जाणिवेने मी लीन झाले आहे. प्रकाशाबद्दल निष्ठा वाढली आहे. या महत्त्वाच्या दिवशी आम्ही सुद्धा सहभागी व्हावे या तुमच्या इच्छेबद्दल मी तुमची आभारी आहे.

– हर्डा लीटन

अमेरिकेत, अरिझोनात सुद्धा वेबकास्ट पूर्ण वेळ अगदी स्पष्ट दिसला. तुमचा संदेश महत्त्वपूर्ण आणि समजायला अगदी सोपा होता. माझा एक ग्रुप आहे जो आज रात्री ध्यान करणार आहे आणि त्याशिवाय मला माहीत असलेले इतर काही ग्रुप्स पण आहेत. म्हणजे क्रांतीची ही चांगली सुरवात आहे. प्रकाशाची निःस्वार्थ सेवा करण्याबद्दल मी तुमचा सन्मान करते.

– करिमा

लाखो लोकांसोबत प्रकाशाचे प्रवहन करून खूप प्रफुल्लित वाटते आहे. ह्या संतुष्टीसाठी गुरुजी मी तुमची आभारी आहे.

– पूजाश्री रमेश

सर्वांसोबत प्रकाशाचे प्रवहन करणे खूपच आल्हाददायी होते. मला माझ्या शरीराच्या प्रत्येक पेशीत प्रकाशाचे कंपन जाणवत होते.

– प्रदीप कुमार


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |


## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# ऋषींचा संदेश

(गुरुजींनी ७ मे ला दिलेल्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: जयंत देशपांडे, अनुवाद : वैशाली जोशी)

मानव बांधवांनो, हा माझ्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. मी एक साधारण माणूस आहे पण आज मी ऋषींकडून एक अत्यंत महत्त्वाचा संदेश आणला आहे. हा संदेश ह्या पृथ्वीवरील प्रत्येक मनुष्यासाठी आहे.

हा एक आशेचा संदेश आहे. हा एक आश्वासनाचा संदेश आहे.

हा संदेश ह्याप्रमाणे आहे...

२०१२ सालाच्या अखेरीस ज्या घटना अपेक्षित आहेत, त्यातील बहुतेक घटना घडतील. पण कोणीही घाबरून जाऊ नये. या जगाचा अंत होणार नाही. ह्या घटनांशी निगडित ज्या विनाशाची भीती पसरलेली आहे, तो विनाश थांबवता येतो. हा ह्या संदेशातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

हा विनाश लोकांच्या आध्यात्मिक परिवर्तनाशी संबंधित आहे. आध्यात्मिकता म्हणजे काय? आध्यात्मिकता म्हणजे केवळ चांगले, प्रामाणिक आणि शांतीपूर्ण असणे. आपण देवळांना जाण्याची गरज नाही. आपण तीर्थयात्रेला जाण्याची गरज नाही. हा आध्यात्मिकतेचा सार आहे. ही व्याख्या उच्च जगांतून सर्व ज्ञान आणणाऱ्या महान गुरुंनी दिलेली आहे.

कोणी विचारू शकतो की, विनाशाचा संबंध आध्यात्मिकीकरणाशी का आहे? सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, आपण काळाच्या एका नव्या चौकटीत, एका नवीन युगात प्रवेश करत आहोत. नवीन युगात वास्तव्य करण्यासाठी, जगण्यासाठी हा चांगुलपणा, प्रामाणिकपणा आणि शांतपणा ह्या न्यूनतम अटी आहेत. जे लोक शांतीपूर्ण राहण्याची, प्रेमळ राहण्याची निवड करणार नाहीत ते नवयुगात जगू शकणार नाहीत.

नवीन युग आता फार दूर नाही. २०१२ साला अखेरीस त्याची सुरुवात होईल. २०१२ सालाच्या शेवटपर्यंत सर्व लोक संत बनणार नाहीत. ऋषी म्हणतात, "तुम्ही पूर्णपणे बदलण्याची गरज नाही. पण तुम्ही निवड करायला हवी. चांगले राहण्याची निवड करा, तेवढेच पुरेसे आहे." निवड केल्याने नवीन युगात प्रवेश करण्यासाठी आपण पात्र होऊ. जेव्हा अनेक लोक निवड करतील, तेव्हा विनाशावर नियंत्रण ठेवणाऱ्या ऋषींना विनाश पूर्णपणे टाळण्यासाठी किंवा कमीतकमी होऊ देण्यासाठी पुरेसे कारण आणि समर्थन मिळेल.

प्रकाशाद्वारे क्रांती ही परिवर्तनासाठी आहे. तयारीसाठी आहे. ही आपल्याला निवड करण्यास मदत करण्यासाठी आहे. प्रकाशाची मदत घेऊन पृथ्वीवर सर्वत्र महान बदल घडवून आणण्यासाठी हा एक मूक प्रयत्न आहे.

हा संदेश संपूर्ण मानवजातीसाठी आहे. सर्व अपरिपूर्ण व्यवस्था कोसळतील. त्या एकाएकी किंवा हळूहळू कोसळतील. मला स्वत:ला असे वाटते की त्या एकाएकी कोसळतील. जेव्हा व्यवस्था कोसळतील, तेव्हा साहजिकच अनागोंदी आणि गोंधळ माजेल. पण ऋषी म्हणतात – काळजी करू नका. त्यांच्याकडे योजना आहेत. ते मदत करतील. त्यांनी ह्या घटना अनेक वेळा पाहिलेल्या आहेत. आपण काही पहिल्यांदा फोटॉन-बेल्टमध्ये प्रवेश करणार नाही.

जेव्हा अपरिपूर्ण व्यवस्था कोसळतील, तेव्हा नवीन व्यवस्था अस्तित्वात येतील. हे ताबडतोब किंवा हळूहळू घडेल. ह्या बाबतीत अजूनपर्यंत निर्णय घेतला गेलेला नाही.

ह्या पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तीशी थेट संपर्क साधला जाईल. मला पुन्हा पुन्हा हे सांगताना खूप आनंद होतो आहे. ऋषी हे किती दयाळू आणि प्रेमळ आहेत. जे लोक बदलणार नाहीत त्यांची देखील अतिशय प्रेमाने काळजी घेतली जाईल. त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाईल किंवा त्यांना शिक्षा केली जाईल असे नाही. परमेश्वराच्या राज्यात शिक्षा नसते. प्रत्येकाला आणखी एक संधी दिली जाते. लाखो वेळा आपण असफल झालो तरी आणखी एक संधी दिली जाते. परमेश्वराचे राज्य हे प्रेमाने भरलेले आहे.

आपल्या सर्व सुप्त क्षमता जसे की, तिसरा डोळा, टेलीपथीने संवाद साधण्याची क्षमता, प्राणशक्तीवर जगण्याची क्षमता इत्यादी जागृत होतील. जेव्हा व्यवस्था कोसळतील तेव्हा कदाचित अन्न उपलब्ध राहणार नाही. तेव्हा प्राणशक्तीवर जगण्याची क्षमता आपल्याला देण्यात येऊ शकते. एकाएकी सर्व लोकांशी संपर्क साधून त्यांना मदत केली जाईल.

काल, बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी एक विशेष ऊर्जा पसरवण्यात आली. आपण जेव्हा प्रकाशाचे प्रवहन करू तेव्हा ही ऊर्जा देखील प्रवाहित होईल. आज प्रवहन केल्यानंतर प्रवहन करणे थांबवू नका. दररोज कमीतकमी ७ मिनिटे प्रवहन करा.

मी हा संदेश योग्यरीत्या तुमच्यापर्यंत पोहोचवला किंवा नाही हे मला ठाऊक नाही. पण मला खात्री आहे की तुमच्यातील प्रकाशाने प्रकाश गुरुंकडून आलेला हा संदेश शुद्धरूपात आणि पूर्णत: ग्रहण केला असणार. मला वाटते की महान ऋषींचा संदेशवाहक बनणे हा माझ्या आयुष्यातील एक सर्वात भाग्याचा क्षण आहे. ■

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande